महाराष्ट्र पोलीस
रक्षणाय खलनिग्रहणाय

मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर
जुना मुंबई पुणे रोड,आनंद कोळीवाडा मुंब्रा, ठाणे
पिन-४००६१२ दुरध्वनी क्रमांक ०२२,२५४६८३१५
e-mail-cp.thane.mumbra@mahapolice.gov.in



दिनांक :-२९/१२/२०२५

प्रेस नोट

महानगरपालिका निवडणुक -२०२५ च्या पार्श्वभुमीवर मुंब्रा पोलीसांची धडक कारवाई देशी बनावटीचे ०२ पिस्टल, ०२ जिवंत काडतुस विक्रीकरीता आलेल्या गुन्हेगारास शिताफीने अटक

महानगरपालिका निवडणुक- २०२५ निवडणुक प्रकिया कायदा व सुव्यवस्थेस बाधा न येता शांततेत पार पडावी याकरिता ठाणे पोलीस आयुक्तालयामध्ये बेकायदेशीर शस्त्र व दारूगोळा बाळगणारे,खरेदी विक्री करणारे इसमांवर विशेष मोहीम राबवुन कारवाई करण्याबाबत मा.पोलीस आयुक्तसो, मा. सह पोलीस आयुक्त सो, ठाणे शहर व अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग ठाणे शहर यांनी वेळोवेळी आदेशीत केले आहे. त्याअनुषंगाने पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१, सहाय्यक पोलीस आयुक्त, कळवा विभाग, ठाणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली अवैद्य रित्या अग्नीशस्त्रे व दारूगोळा बाळगणारे, खरेदी विक्री करणाऱ्या इसमावर कारवाई करणे करीता वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे, मुंब्रा पोलीस स्टेशन,ठाणे यांनी मार्गदर्शन करून सुचना दिलेल्या आहेत.

सदर आदेशाची अंमल बजावणी करत असताना **मुंब्रा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक/ विनायक माने यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, फकरूद्दीन बाबा दर्गा रोड, खडी मशिन रोड, डोंगराच्या पायथ्याशी मुंब्रा, ता.जि. ठाणे येथे एक इसम अवैदय अग्नीशस्त्र,काडतुस गावठी पिस्टल घेवुन विक्री करिता येणार आहे.** सदर बातमीचे अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक/ अनिल शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/ विनायक माने, नेम-मुंब्रा पोलीस स्टेशन,ठाणे शहर यांनी व त्यांच्या पथकाने, फकरूद्दीन बाबा दर्गा रोड, खडी मशिन रोड, डोंगराच्या पायथ्याशी मुंब्रा, ता.जि. ठाणे येथे सापळा रचला असता इसम नामे-**सलीम अब्दुल रहेमान शेख, वय-३६ वर्षे,राह- रुम नं.०२, अमीना चाळ, चर्नीपाडा, हुंडेकर निवास जवळ, कौसा, मुंब्रा, ता.जि. ठाणे हा अवैदयरित्या अग्नीशस्त्रासह मिळुन आला. त्याचेकडुन ३०,३००/- रु कि.चे. ०१ देशी बनावटीचे पिस्टल मॅगझीनसह व सोबत ०१ जिवंत राउंड(काडतुस) हस्तगत करण्यात आले आहे**. आरोपीत हा मा. पोलीस आयुक्त ठाणे शहर यांनी जारी केलेला मनाई आदेशाचा भंग करीत असताना मिळुन आल्याने त्याचेविरुध्द मुंब्रा पोलीस ठाणे गु.र.नं. ॥ २२१९/२०२५ भा.ह.का.क. ३,२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)/१३५ प्रमाणे दि. २७/१२/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीत हा मा. न्यायालयाचे आदेशाने न्यायालयीन कोठडीत आहे.

Scanned with CamScanner

तसेच दिनांक २७/१२/२०२५ रोजी मुंब्रा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक/ तेजस सावंत यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सम्राटनगर येथुन बायपास कडे जाणाऱ्या रोडवर, भगवान महाविर यांचे पुतळयाचे पाठीमागे, मुंब्रा येथे एक इसम अवैदय अग्नीशस्त्र,काडतुस गावठी पिस्टल घेवुन विक्री करिता येणार आहे. सदर बातमीचे अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक/ अनिल शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/ तेजस सावंत, नेम-मुंब्रा पोलीस स्टेशन,ठाणे शहर यांनी व त्यांच्या पथकाने, सम्राटनगर येथुन बायपास कडे जाणाऱ्या रोडवर, भगवान महाविर यांचे पुतळयाचे पाठीमागे, मुंब्रा येथे सापळा रचला असता इसम नामे-आयान इरफान शेख, वय-२१ वर्षे, राहणार- के.जी.एन. बिल्डींग, रुम नं. ३०२, बॉस्को स्कुल जवळ, रशिद कंम्पाउंड, मुंब्रा. ता.जि. ठाणे हा अवैदयरित्या अग्नीशस्त्रासह मिळुन आला. त्याचेकडुन ३१,०००/- रू कि.चे. ०१ देशी बनावटीचे पिस्टल मॅगझीनसह व सोबत ०१ जिवंत राउंड(काडतुस) हस्तगत करण्यात आले आहे. आरोपीत हा मा. पोलीस आयुक्त ठाणे शहर यांनी जारी केलेला मनाई आदेशाचा भंग करीत असताना मिळुन आल्याने त्याचेविरुध्द मुंब्रा पोलीस ठाणे गु.र.नं. ॥ २२३७/२०२५ भा.ह.का.क. ३,२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)/१३५ प्रमाणे दि.२७/१२/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान नमुद आरोपीस दिनांक २७/१२/२०२५ रोजी अटक करण्यात आलेली असुन, मा. न्यायालयाने त्यास दिनांक २९/१२/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर केली आहे.

सदर कारवाई आशुतोष डुंबरे/ पोलीस आयुक्त,ठाणे शहर, ज्ञानेश्वर चव्हाण/सह पोलीस आयुक्त,ठाणे शहर, विनायक देशमुख/अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर, सुभाषचंद्र बुरसे/ पोलीस उप.आयुक्त, परि-१ ठाणे, प्रिया डमाळे/सहाय्यक पोलीस आयुक्त, कळवा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली मुंब्रा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक/अनिल शिंदे, पोलीस निरीक्षक गुन्हे शदर कुंभार पोलीस निरीक्षक नितीन पगार, पोलीस निरीक्षक राजु पाचोरकर सपोनि/तेजस सावंत,सपोनि/विनायक माने,पोहवा/१५०७ खाबडे, पोहवा/१९८९ तडवी, पोहवा/५३०२ शिंदे, पोहवा/७३५ थोरात,पोशि/८३७९ आव्हाड, पोशि/२७५८ पाटोळे, मपोशि/ १९७८ देसाई, पोशि/८०९१ विरकर, पोशि/१५९९ घुले, पोशि/१४७५ महाडिक यांनी केलेली असुन, गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/तेजस सावंत हे करीत आहेत.

Scanned with CamScanner